# आरोग्य विभाग जि. प.सांगली

दुरध्वनी - ०२३३- २३७३०३२, २३७४४६२
फॅक्स - ०२३३ - २३७४४६२
Email Address :- zpdhosan@yahoo.co.in
phn.zpsangli@gmail.com

जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद सांगली कार्यालय
सांगली मिरज रोड, सांगली.४१६४१६


जा.क्र.आरोग्य/मुशुनों/खाजगी शुश्रुषागृह/बिल/तक्रार/२५७८ ५२९७ /२०२३ दि.१४ १७-०७-२०२३

प्रति,

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती..........(सर्व)

**विषय :- खाजगी हॉस्पीटलच्या बिलाबाबत....**

**संदर्भ** :- मा.सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय व राज्यस्तर), मुंबई यांचेकडील पत्र.क्र आसेआ/कक्ष-३/ टे-८/तक्रार/ दौंड कांग्रेस कमिटी/४६४९-४७५१/२३ दि.०८/०५/२०२३ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन, दौंड तालुका कांग्रेस कमिटी यांनी रुग्णाच्या मृत्यूनंतर खाजगी रुग्णालयांकडून आकारल्या जाणाऱ्या बिलामध्ये लूटमार होत असल्याबाबत मा.मुख्यमंत्रीसो महोदय यांना कळविले आहे. तरी संदर्भीय पत्रान्वये राज्य कार्यलयामार्फत या कार्यलयास दौंड तालुका कांग्रेस कमिटी यांचे निवेदन पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करणेकरिता सुचना प्राप्त झाले आहेत.

सोबत दौंड तालुका कांग्रेस कमिटी यांचे निवेदन पत्र जोडत असून, सदर निवेदनाच्या अनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रामध्ये योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच रुग्णाच्या मृत्यूनंतर खाजगी रुग्णालयांकडून अवाजवी बील आकारु नये व रुग्णांच्या नातेवाईकांना सौजण्याची वागणूक देऊन त्यांना मानसिक त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सर्व खाजगी हॉस्पीटलांना लेखी द्वारे सक्त सुचित करावे. या प्रमाणे केलल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यलयास सादर करावा.

खाजगी हॉस्पीटलांना सुचित करुन ही, वरील सुचनांचे पालन करत नसलेचे निर्दशनास आल्यास अश्या खाजगी हॉस्पीटलांवर त्वरीत कार्यवाही करुन या कार्यलयास अहवाल सादर करावा. जेणेकरुन जिल्हास्तरावरुन देखील योग्य ती कार्यवाही करणेस सोयस्कर होईल.

(डॉ.दिलीप माने)
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, सांगली.**

**प्रत सविनय सादर,**
मा.जिल्हाधिकारी, सांगली
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा.सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय व राज्यस्तर), मुंबई
मा.सहा.संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
मा.उपसंचालक, आरोग्य सेवा,कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

E - 5305

# आरोग्य सेवा आयुक्तालय ,

## (महाराष्ट्र राज्य)

आरोग्य भवन, ६वा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय, आवार, पी'डिमेलो रोड, मुंबई ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | Website : http://maha-arogya.gov.in |
|---|---|---|
| आयुक्त, आरोग्य सेवा | २२६२ ०२३५ | Email : jdhso३@gmail.com |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | |
| सहसंचालक (रुग्णालये) | २२६११४७१ | |

आरोग्य सेवा

क्र आसेआ/कक्ष-३/टे-८/तक्रार/दौंड कॉंग्रेस कमिटी/४६२८ ४०५९ /२३

दिनांक- ८/०५/२३

प्रति,

१) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका(सर्व).

२) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय(सर्व).

३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद(सर्व).

४) वैद्यकीय अधिकारी, कंटोमेण्ट बोर्ड(सर्व).

2752 10/5/23

विषय - खाजगी हॉस्पीटलच्या बिलाबाबत...

संदर्भ - शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.३५/कु.क.दि.०८.०२.२०२३.

उपरोक्त विषयांकित शासनाच्या संदर्भाधीन पत्रासोबत दौंड तालुका कॉंग्रेस कमिटी, दौंड यांचे दि. १६/०१/२०२३ रोजीचे निवेदन या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदर निवेदनाचे अवलोकन केले असता, दौंड तालुका कॉंग्रेस कमिटी यांनी रुग्णाच्या मृत्यूनंतर खाजगी रुग्णालयाकडून आकारल्या जाणा-या बिलामध्ये लूटमार होत असल्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांना कळविले आहे.

तरी, सदर निवेदनाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच रुग्णाच्या मृत्यूनंतर खाजगी रुग्णालयाकडून अवाजवी बील आकारू नये व रुग्णांच्या नातेवाईकांना सौजण्याची वागणूक देऊन त्यांना मानसिक त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात यावे.

( सोबत अर्जाची प्रत जोडण्यात येत आहे.)

(डॉ. विजय कंदेवाड)
सहसंचालक,आरोग्य सेवा,
रुग्णालये(राज्यस्तर) मुंबई.

पत्र माहितिस्तव :

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, कु.क.गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.

२) दौंड तालुका कॉंग्रेस कमिटी, मु.पो.भिमनगर, दौंड, ता.दौंड, जि.पुणे.

सांगली जिल्हा परिषद, सांगली.
आरोग्य विभाग
आवक क्र.-
04 JUN 2023
अधिक्षक क.अ. प्र.अ.
जि.आ.अ.

D.P.H.N

16/1/2023

INDIAN NATIONAL CONGRESS

# दौंड तालुका कॉंग्रेस कमिटी


**महासचिव दौंड तालुका - मा.प्रकाश विष्णु सोनवणे**

मु.पो.भिमनगर , दौंड,ता.दौंड,जि.पुणे

Membership Id – MH0370813

मो.नं.९८९०११३०७७ Email ID – congress.mahasachivdaund@gmail.com


मुख्यमंत्री सचिवालय टपाल शाखा 25 JAN 2023 5657928.

जा.क्र. – 13 दिनांक : 16/1/२०२३

प्रति,

मा.एकनाथ शिंदे सो,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

**विषय : खाजगी हॉस्पीटलमध्ये रूग्णाचा मृत्यु झाल्यास बील न घेता मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून महाराष्ट्रातील तमाम खाजगी हॉस्पीटल मध्ये मृत्यु झाल्यावर जे बील आकारले जाते ते बील रूग्णांच्या कुटुंबियांना त्रासदायक ठरत आहे यामुळे हॉस्पीटल अधिक अधिक बील आकारून मृत्युनंतरही कुटुंबियांची पिळवणूक करत आहेत तरी ही पिळवणूक कोणीतरी कोठेतरी थांबवावी ही आपल्या सरकारकडे सामान्य जनतेच्या मनातील मागणी आहे. खाजगी हॉस्पीटलांची फक्त लुटमार सुरू आहे हॉस्पीटलमध्ये मृत्यु झाल्यास खाजगी हॉस्पीटल त्या कुटुंबियांशी व्यवस्तिपणे वागणूक करत नाही ते फक्त तुम्ही राहीलेली रक्कम कधी देणार आहात याचा तगादा लावून धरतात त्यामुळे मृत्यु झालेल्या मानसाच्या कुटुंबियांची पिळवणूकच होत असून हे कुठेतरी थांबले पाहिजे. असे केल्याने महाराष्ट्रत तमाम गोरगरीब जनतेला दिलासा मिळेल तरी आमच्या निवेदनाचा विचार करावा ही आपणास नम्र विनंती.

| | | | |
|---|---|---|---|
| **मा. विठ्ठल खराडे**<br>दौंड तालुका अध्यक्ष<br>कॉंग्रेस कमिटी | **मा. हरेश ओझा**<br>शहर अध्यक्ष कॉंग्रेस<br>कमिटी | **मा. स्वप्नील सोनवणे**<br>दौंड तालुका सोशल<br>मिडीया अध्यक्ष | **मा.प्रकाश सोनवणे**<br>दौंड तालुका महासचिव<br>कॉंग्रेस कमिटी |
| **मा.संकेत क्षीरसागर**<br>दौंड शहर युवक<br>उपाध्यक्ष कॉंग्रेस<br>कमिटी | **मा. अजय गायकवाड**<br>दलित पँथर | **मा. पोपटराव गायकवाड**<br>दौंड तालुका उपाध्यक्ष<br>कॉंग्रेस कमिटी | **मा.निलेश बगाडे**<br>युवक कार्यकर्ता<br>कॉंग्रेस कमिटी |

सार्वजनिक आरोग्य मंत्रालय, मुंबई-३२
30 JAN 2023
कार्यासन क्रमांक 631
अनुक्रमांक

५२१/कु.क./मंत्री
02.02.2023